महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ९२ वे | दिनांक : २६/०३/२०२६ | वार : गुरुवार

## झिरो FIR वरून विधानसभेत खडाजंगी; मुख्यमंत्री - रोहित पवार आमने - सामने





**मुंबई** : आज राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे दोन्ही सभागृहांत कामकाजाचा तुफान धडाका सुरू आहे. आज विधानसभेने भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयकावर आपली मोहोर उमटवली. त्यानंतर झालेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी राज्यातील 38 आमदारांनी भोंदू अशोक खरातकडे जाऊन आपल्या करंगळ्या कापल्याचा दावा करून एकच खळबळ उडवून दिली.सातारा जिल्हा परिषद निवडणुकीतील वादानंतर एसपी तुषार दोशींच्या निलंबनावरून सत्ताधारी शिवसेना आणि भाजपमध्ये तीव्र मतभेद समोर आले आहेत. उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिलेले निलंबनाचे आदेश सभापती राम शिंदे यांनी 'अधिकार कक्षेबाहेरचे' ठरवत रद्द केले आणि त्याऐवजी चौकशीचे निर्देश दिले.

या निर्णयावर मंत्री शंभुराजे देसाई, उदय सामंत आणि शशिकांत शिंदे यांनी जोरदार आक्षेप घेतल्याने सभागृहात मोठा गदारोळ झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायदेशीर पेच मांडल्यानंतर सभापतींनी घेतलेल्या या भूमिकेमुळे शिवसेनेने नाराजी व्यक्त केली आहे. या गोंधळामुळे विधानपरिषदेचे कामकाज अर्धा तास तहकूब करावे लागले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावर उत्तर देताना अजित पवारांच्या विमान अपघातावर भाष्य केले. त्यांच्या उत्तरावर बोलताना, रोहित पवार म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी अजितदादांच्या विषयी बोलत असताना सकारात्मक उत्तर दिले आहे. ते 100 टक्के अजित दादांना न्याय देण्याचा पर्यटन करतील सगळ्यांना विश्वास आहे. त्यांनी किंवा आम्ही कुठेच त्याबाबत राजकारण केलेले नाही. मुख्यमंत्री एडीआर बद्दल बोलले. त्यांनी ललिला कुमारीचा संदर्भ दिला. मला फक्त एवढेच सांगायचे आहे की, अमित कुमार vs युनियन ऑफ इंडियन ऑदर्स याच्यामध्ये बघितले, तर एडीआर झाला असेल, तर एफआयआर करता येतो.

रोहित पवार म्हणाले, मी राहुल गांधींना भेटलो. त्यांना भेटल्यानंतर डीटेलमध्ये चर्चा झाली. त्या चर्चेवेळी एफआयआर महाराष्ट्रात घेतला जात नसल्याचे मी त्यांना बोलून गेलो. त्यांनी एवढेच सांगितले की, जिथे न्याय मिळेल, तिथे जाऊन एफआयआर दाखल करा. त्यांनी कुठल्याही राज्याचे नाव घेतलेले नाही. भूषण कुमार गवई यांच्यावर बूट फेकण्यात आला, तेव्हा महाराष्ट्रात अनेकांना त्याबाबत झिरो एफआयआर करायचा होता, पण महाराष्ट्रात तसे काही घडले नाही. मात्र कर्नाटकात झिरो एफआयआर झाला होता. तिच गोष्ट बघून मी कर्नाटकात गेलो. कारण माझा इथे प्रयत्न करून झाला होता.

रोहित पवार म्हणाले, अजित पवारांच्या प्रकरणात कुणीही राजकारण केलेले नाही. या प्रकरणात कर्नाटकाकडून उलट मदतच
झालेली आहे. राज्यसभेमध्ये हाच मुद्दा चर्चेत आला होता. दुसरीकडे झिरो एफआयआर होऊ शकतो का? त्याला देशाचे गृहमंत्री यांनी १० डिसेंबर २०२५ ला उत्तर दिले होते. झिरो एफआयआर आपल्याला कुठेही करता येतो. उत्तर प्रदेशमध्ये भाजप सरकारने देखील झिरो एफआयआरबद्दल एक नोटीस काढलेली आहे. त्यामुळे झिरो एफआयआर हा होऊ शकतो.

कर्नाटकाने झिरो एफआयआर दाखल केलेला आहे. कर्नाटक तपास करू शकत नाहीत. त्यामुळे तो आता महाराष्ट्राकडे ट्रान्सफर झालेला आहे. महाराष्ट्र सरकार आणि पोलिस प्रशासन चांगलाच तपास करेल, असा आमचा विश्वास आहे. फक्त संभ्रम नसावा एवढीच आमची विनंती आहे.

रोहित पवार म्हणाले, मुख्यमंत्री सीबीआयबद्दल म्हणाले की, एक रिपोर्ट येऊ मग आपण त्याबद्दल करून. पण एआयबीचा आपण इतिहास बघितला, तर दोन-तीन वर्ष फायनल रिपोर्ट येत नाही. आजपर्यंत एआयबीचा रिपोर्ट कधीही वेळेवर आला नाही. त्यामुळे तुम्ही पुढाकार घेतला, तर सीबीआय चौकशीला सुरुवात होऊ शकते. कर्नाटकाकडून आलेला एफआयआर स्वीकारावा. एआयबी वैगेरे काही विभाग संथ गतीने काम करतात, त्यात तुमचे वैयक्तिक लक्ष असावे, अशी विनंती रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली.

रोहित पवार यांनी कर्नाटकमध्ये एफआयआर दाखल केला आहे. महाराष्ट्रात एफआयआर दाखल होऊन अजितदादांना न्याय मिळू शकला नाही, अशी खंतही रोहित पावर यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर आता या प्रकरणी देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर माहिती दिली. झिरो एफआयआर म्हणजे काय? हे सांगताना कर्नाटक सरकारला अशा प्रकारचा एफआयआर दाखल करून घेण्याचा कोणताही अधिकार नाही, असेही यावेळी फडणवीस यांनी सांगितले. अजितदादांच्या अपघातामागे घातपात असेल तर कोणालाही सोडणार नाही, असे आश्वासनही यावेळी फडणवीस यांनी दिले.

## भोंदू प्रकरणावरून राजकारण तापलं ; ३८ आमदारांवर गंभीर आरोप, आव्हाडांची कारवाईची मागणी



**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आज भोंदू अशोक खरातला कोणत्याही स्थितीत जिवंत ठेवण्याची मागणी केली. अशोक खरातला महाराष्ट्रातील मागील २० वर्षांच्या राजकारणाची इत्यंभूत माहिती आहे. त्यामुळे त्याची गत जेफ्री एपस्टीनसारखी होऊ नये यासाठी त्याला कायम कॅमेऱ्याखाली ठेवा. तो जिवंत राहील याची व्यवस्था करा, असे ते म्हणालेत. राज्यातील ३८ आमदारांनी भोंदू खरातकडे जाऊन करंगळ्या कापल्याचा दावाही आव्हाड यांनी यावेळी केला.

जितेंद्र आव्हाड विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना म्हणाले, अशोक खरातने बाळू तुपे नावाच्या पत्रकाराचा २००७ मध्ये खून केला. नाशिकमध्ये याची शांतपणे चर्चा सुरू होती. तेव्हा कुणीही हे प्रकरण गांभिर्याने घेतले नाही. या प्रकरणी एका वृत्तपत्रात १० लेख लिहून आले. त्यामुळे अशोक खरात पत्रकारांना माहिती नव्हता, पोलिसांना माहिती नव्हता, महाराष्ट्राला माहिती नव्हता असा भाग नाही. मग हा गुप्तहेर यंत्रणेचे अपयश नाही का? अशोक खरातची माहिती मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांना देणे गरजेचे होते की नाही. या आरोपींना वाचवण्यासाठी पोलिसांनी किती पैसे घेतले हे कुणाला माहिती असेल तर ते केवळ देवेंद्र फडणवीस यांनाच ठावूक आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले, या प्रकरणात चांगल्या - चांगल्या अधिकाऱ्यांनी पैसे घेतले. चांगले-चांगले अधिकारी तिथे जाऊन लोटांगण घालत आहेत. मी खात्रीने सांगतो की, अशोक खरातच्या माध्यमातून काहीजण मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीला सुरुंग लावण्याचा प्रयत्न करत होते. हे मुख्यमंत्र्यांनाही माहिती आहे. हे लोक अशोक खरातकडे पुजा घालण्यासाठी गेले होते. वेळ येईल तेव्हा नाव उघड करू. ही सगळी माहिती मुख्यमंत्र्यांना ६ महिन्यांपूर्वी मिळाली होती. थोडे दिवस द्या मुख्यमंत्री घरी गेलेले असतील अशी हमी अशोक खरातने या लोकांना दिली होती. अशा प्रकारच्या पुजेला, जादूला राजमान्यता देणार असू, सरकारी पैसा देणार असू तर हे खूप वाईट आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी करंगळ्या कापणाऱ्या ३८ आमदारांची लिस्ट उपलब्ध असल्याचाही दावा केला. ते म्हणाले, अशोक खरातच्या ठिकाणांवर सरकारी पैशांच्या माध्यमातून पाण्याच्या टाक्या व रस्ते बांधण्यात आले. एवढा कोण मोठा आहे तो खरात? कुठला काळ्या जादूवाला आहे. वाईट या गोष्टीचे वाटते की, या संत तुकारामांच्या, संत ज्ञानेश्वरांच्या महाराष्ट्रात, शिवरायांच्या महाराष्ट्रात आपण काळ्या जादूला एवढी मान्यता द्यायला लागलो की राजकारणात काळ्या जादूने काहीही होऊ शकते असे समस्त आमदारांना वाटायला लागले आहे. तिकडे जाऊन करंगळ्या कापणाऱ्या ३८ आमदारांची लिस्ट आहे. अशी कशी परिस्थिती महाराष्ट्रात उद्भवली? हा खरात वेगवेगळ्या खात्यातील बदल्याही करत होता, असे आव्हाड आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.

जितेंद्र आव्हाड यांनी यावेळी अशोक खरातला कायम सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणीखाली ठेवण्याचीही मागणी केली. ते म्हणाले, इराणचे युद्ध हे केवळ जेफ्री एपस्टीनच्या फाईल्स बाहेर येऊ नये म्हणून सुरू आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २६ मार्च २०२६


## सरोश प्राथमिक शाळेत रंगला कविता दिन




**छत्रपती संभाजीनगर (अय्युब पठाण) :** छत्रपती संभाजीनगर शहराजवळ असलेल्या मीटमीटा येथील सरोश मराठी प्राथमिक शाळेत नुकतेच कविता दिनाचे औचित्य साधून प्रसिध्द कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी कविता वाचनांचा कार्यक्रम घेतला. या कार्यकमात अय्युब पठाण यांनी प्रारंभी विद्यार्थी यांना बाल कविता चालीवर गाऊन दाखविल्या. त्यानंतर कविता कशी लिहावी याची माहिती दिली. काही विनोदी चारोळ्यांचे सादरीकरण करून मुला-मुलींना भरपूर हसविले. आणि शेवटी सांगितले की, " कविता काय असते? कविता म्हणजेच ज्या कवितेत भावना मोहरून रडते ती कविता चांगली असते. प्रत्येक काळजाचे आभाळ होत नसते तर शब्दांना रक्तांचे अमृत पाजावे लागते ती कविता असते. कथेविषयी सांगितले," ज्या कथेत असती व्यथा ती कथा चागली असते." शेवटी "आई," ही करूणरसातील संगीतमय कविता मधूर आवाजात सादर केली. ही कविता ऐकूण सर्वांचे डोळे पाणावले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून रामपाटील एरंडे, तसेच मुख्याध्यापक समीर पठाण शिक्षक अशरफ पठाण, इरफान पठाण, शेख युनूस, इरफान देशमुख यांच्यासह विद्यार्थी व परीसरातील पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. सुधीर देवरे यांच्या पाच नव्या पुस्तकांचे प्रकाशन; एकूण ग्रंथसंख्या ३७ वर पोहोचली



**सटाणा :** ज्येष्ठ साहित्यिक, भाषातज्ज्ञ, समीक्षक, संशोधक व भाषा, कला, लोकजीवन, लोकसंस्कृती यांचे अभ्यासक डॉ. सुधीर रा. देवरे यांची पाच पुस्तके शब्दालय प्रकाशनातर्फे नुकतीच प्रकाशित झाली. या पुस्तकासह डॉ. सुधीर देवरे यांची आतापर्यंत ३७ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'भाषा अहिराणी (भाषा)', 'मानोसना शंभर वरीस' (अहिराणी लोककथा संपादन), 'समीक्षा : साहित्य, कला आणि जीवन' (समीक्षा), 'पाय नसलेली माणसं' (कवितासंग्रह), 'पंख गळून गेले तरी' (आत्मचरित्र, दुसरी आवृत्ती) अशी ही पाच पुस्तके आहेत. 'डंख व्यालेलं अवकाश', 'आदिम तालनं संगीत', 'कला आणि संस्कृती: एक समन्वय', 'अहिराणी लोकपरंपरा', 'अहिराणी गोत', 'अहिराणी वट्टा', अहिराणी लोकसंस्कृती', 'अहिराणीच्या निमित्ताने: भाषा', 'अहिराणी : भाषा, परंपरा आणि संस्कृती', 'भाषा : व्याप्ती आणि गंड', 'मी गोष्टीत मावत नाही', 'सोन्याची शाळा', 'गावदवंडी', 'डोंगरदेव', 'माणूस जेव्हा देव होतो', 'सहज उडत राहिलो', 'साहित्य : जाणिवा, मीमांसा आणि समीक्षा', 'आस्वाद: भावलेल्या कवितांचा', 'माणसं मरायची रांग', 'ब्लॉगच्या जाळ्यातून जग', 'सायकोचा तिढा' आदी डॉ. सुधीर देवरे यांची या आधीची ग्रंथसंपदा आहे.

## 'संविधान वाचा' : संवैधानिक जाणीव जागवणारी दिशादर्शक पुस्तिका प्रा.डॉ. शेख आरिफ ताजुद्दीन




भारतीय लोकशाहीची खरी ताकद तिच्या संविधानात दडलेली आहे. संविधान हे केवळ कायद्यांचे संकलन नसून ते राष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनाला दिशा देणारे मूलभूत तत्त्वज्ञान आहे. प्रत्येक नागरिकाने संविधान समजून घेऊन त्यातील मूल्यांचे आचरण आपल्या दैनंदिन जीवनात केले पाहिजे. लोकशाही अधिक सक्षम आणि सजग ठेवण्यासाठी संविधानाची जाणीव समाजात रुजविणे अत्यंत आवश्यक आहे. ही जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'संविधान वाचा' ही पुस्तिका करते.या पुस्तिकेचे मूळ लेखक निवृत्त न्यायमूर्ती एच. एन. नागमोहनदास असून कन्नडमधील या ग्रंथाचा सुबोध मराठी अनुवाद डॉ. मुतवल्ली एम. एम. यांनी केला आहे. अत्यंत सोप्या, नेमक्या आणि प्रभावी भाषेत संविधानातील मूलभूत संकल्पना सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या पुस्तिकेत दिसून येतो.या ग्रंथाला कर्नाटकातील ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत बारागुरू रामचंद्रप्पा यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभली आहे. या प्रस्तावनेत त्यांनी समकालीन सामाजिक परिस्थितीचे मार्मिक विश्लेषण केले आहे. अलीकडील काळात देशात संविधान जाळण्यासारख्या घटना घडत असल्याचे ते नमूद करतात. समाजात वाढत चाललेली जातीयता, सामाजिक असहिष्णुता आणि दिशाभूल करणारा प्रचार ही परिस्थिती निर्माण होण्यामागील प्रमुख कारणे असल्याचे ते स्पष्ट करतात. राज्यघटनेने दिलेल्या आरक्षणामुळे उच्चवर्णीय समाजातील गुणवंत व्यक्तींवर अन्याय होत असल्याचा खोटा प्रचार केला जात असल्याचेही ते नमूद करतात.प्रत्यक्षात आरक्षण ही संकल्पना कोणत्याही समाजघटकाच्या विरोधात नसून, इतिहासात दीर्घकाळ जातीय अत्याचार सहन केलेल्या आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे आरक्षणाकडे विरोधाच्या दृष्टीने न पाहता सामाजिक न्यायाच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे, असे ते ठामपणे सांगतात. संविधानाबद्दल निर्माण होणारे गैरसमज दूर करण्यासाठी समाजाला संविधानाची खरी ओळख साध्या, सोप्या आणि स्पष्ट भाषेत करून देण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली आहे.पुस्तिकेची रचना बारा परिशिष्टांमध्ये करण्यात आली असून त्यामध्ये भारतीय संविधानाची मूलभूत तत्त्वे, त्याचा ऐतिहासिक उगम, सामाजिक न्यायाची संकल्पना आणि लोकशाही मूल्यांचा सखोल विचार मांडलेला आहे. भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत अधोरेखित केलेले न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही मूल्ये लोकशाहीचे आधारस्तंभ असल्याचे लेखक स्पष्ट करतात.भारतीय स्वातंत्र्यलढा हा केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष नव्हता, तर सामाजिक आणि आर्थिक समतेच्या स्थापनेसाठीही होता, ही बाब या ग्रंथातून अधोरेखित होते. भारतीय संविधानात ३९५ कलमे आणि बारा परिशिष्टे असून भारताला लोकशाही आणि कल्याणकारी राज्य म्हणून घडविण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे. संविधान नागरिकांना अधिकार देतानाच कर्तव्यांचीही जाणीव करून देते, ही महत्त्वाची बाब लेखकाने स्पष्ट केली आहे.या संदर्भात तेलुगूतील प्रख्यात विचारवंत गुरुजादा अप्पाराव यांचे प्रसिद्ध विधान अत्यंत समर्पक ठरते— "देश म्हणजे केवळ माती नव्हे, तर देश म्हणजे तिथे राहणारे लोक असतात." या विचारातून लोकशाहीचे मूळ तत्त्व अधोरेखित होते. देशाची खरी शक्ती त्यातील लोकांमध्ये असते आणि त्या लोकांच्या हक्कांचे संरक्षण करणारे साधन म्हणजे संविधान होय.समकालीन परिस्थितीमध्ये संविधानाबद्दल गैरसमज निर्माण करून समाजात असहिष्णुतेचे वातावरण तयार केले जात आहे. अशा वेळी न्यायमूर्ती नागमोहनदास यांनी लिहिलेले हे छोटेसे पुस्तक संविधानाची योग्य ओळख करून देणारे महत्त्वपूर्ण साधन ठरते. आकाराने लहान असले तरी आशयाने अत्यंत व्यापक असलेली ही पुस्तिका संविधान समजून घेण्याची एक ऐतिहासिक गरज पूर्ण करते, असेही प्रस्तावनेत नमूद करण्यात आले आहे.पुस्तिकेचे मुखपृष्ठ आणि मलपृष्ठही पुस्तकाच्या आशयाशी सुसंगत आहेत. मुखपृष्ठावर भारतीय राज्यघटनेच्या प्रतीकात्मक प्रतिमेसह 'संविधान वाचा' हा शीर्षक मजकूर ठळकपणे मांडलेला आहे, तर मलपृष्ठावर संविधानाची उद्देशिका दिलेली आहे. त्यामुळे वाचकाला संविधानातील मूलभूत मूल्यांची थेट जाणीव होते.एकूणच 'संविधान वाचा' ही पुस्तिका संविधानाचे महत्त्व सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणारी, संवैधानिक जाणीव जागवणारी आणि विशेषतः विद्यार्थी व तरुण पिढीसाठी मार्गदर्शक ठरणारी दिशादर्शक पुस्तिका आहे.

**पुस्तिकेचे नाव :** संविधान वाचा
**मूळ लेखक :** न्यायमूर्ती एच. एन. नागमोहनदास
**अनुवादक :** डॉ. मुतवल्ली एम. एम.
**पृष्ठसंख्या :** १२०
**किंमत :** ६० रुपये




**- प्रा.डॉ. शेख आरिफ ताजुद्दीन**
**मो. ७०२०२ ६८४७१**



**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.
दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २६ मार्च २०२६

## विविध कृषी पुरस्कारांकरीता ३१ मार्च २०२६ पूर्वी अर्ज ऑनलाईन सादर करणे बाबत

**बीड (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. सदर पुरस्कार माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावरhttps://krishi.maharashtra.gov.in कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे. सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे फायदा होणार आहे

- ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार.
- ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलद गतीने होणार आहे.
- एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा-पुन्हा देण्याची आवश्यकता नाही.
- अर्ज कुठल्या टप्प्यावर आहे याची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळणार आहे.
- छपाई, झेरॉक्स, प्रवास व पोस्ट खर्च कमी होणार असून आर्थिक भार कमी होणार आहे.

वरीलप्रमाणे जिल्ह्यातून इच्छुक शेतकरी/व्यक्ती/संस्था/गट यांना सन २०२५ पासूनचे विविध कृषी पुरस्कार बाबतचे अंतिम दि ३१ मार्च २०२६ पूर्वी अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेबाबत आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बीड सुभाष साळवे यांनी केले आहे.

## माहेर व पालक मेळाव्यात करिअर मार्गदर्शनाचा प्रभावी संगम




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयाच्या सभागृहात माहेर व पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई या होत्या. प्रमुख अतिथी म्हणून सामाजिक कार्यकर्त्या व पर्यावरणवादी सौ. स्वाती स्मार्त तसेच माजी विद्यार्थिनी कार्यकारणीच्या अध्यक्ष डॉ. शिल्पा जीवरग (नेहरू कॉलेज, छत्रपती संभाजीनगर) उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर पालक व माहेर मेळावा समिती प्रमुख डॉ. पराग चौधरी आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार यांचीही उपस्थिती होती. विद्यार्थिनींना आणि त्यांच्या पालकांना विविध क्षेत्रातील करिअरच्या संधींबाबत माहिती मिळावी व विद्यार्थिनी आर्थिक- दृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात, या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शन करताना सौ. स्वाती स्मार्त यांनी स्पर्धा परीक्षांद्वारे मिळणाऱ्या नोकरीच्या संधींची माहिती दिली. तसेच विद्यार्थिनींनी आपल्या क्षमतांची ओळख करून, आवडीनुसार कौशल्य विकसित करून लघुउद्योग सुरू करण्याचे मार्गदर्शन उदाहरणांसह केले. पालक प्रतिनिधी म्हणून सौ. सुनीता दैठणकर यांनी मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाबद्दल समाधान व्यक्त केले व "माझ्या मुलीसाठी उत्कृष्ट महाविद्यालय मिळाले," अशी प्रतिक्रिया दिली. माजी विद्यार्थिनी अबोली गावपांडे आणि शोभा शेलार यांनी मनोगतात महाविद्यालयाशी असलेली आत्मीयता व्यक्त करत, "येथे आल्यावर माहेरी आल्यासारखे वाटते," असे सांगितले. तसेच कार्यक्रमातून करिअरविषयक उपयुक्त माहिती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.माजी विद्यार्थिनी कार्यकारिणीच्या अध्यक्ष डॉ. शिल्पा जीवरग यांनी सोपवलेली जबाबदारी यशस्वीपणे पार पाडण्याचे आश्वासन दिले. यावेळी नवीन कार्यकारिणीची निवड करून त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच एसबीआय बँकेत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थिनी पल्लवी पालमकर हिचाही सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी व कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार यांनी एक लाख रुपयांची देणगी दिली, तर प्राचार्य सुनंदा तिडके यांनी २५ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी माजी विद्यार्थिनींच्या सहभागाबद्दल समाधान व्यक्त करत, महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक पालक मेळाव्यासाठी डॉ. पराग चौधरी यांनी, तर माहेर मेळाव्यासाठी डॉ. मीनाक्षी देव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सुषमा देशपांडे यांनी केले आणि आभार प्रदर्शन डॉ. सुनंदा चक्रनारायण यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थिनी, पालक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी. क्रीडा बक्षीस वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका मा. आयुक्त श्री जी. श्रीकांत सर यांच्या संकल्पनेतून "मला खेळू द्या" या उपक्रमांतर्गत शिक्षण विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा महोत्सव २०२५-२६ आयोजित करण्यात आला. या अंतर्गत विजेते व सहभागी विद्यार्थ्यांना केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे बक्षीस वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी सर होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून श्री राजेंद्र डंगवालजी व श्री संजय जीनवाल उपस्थित होते.यावेळी मान्यवरांच्या हस्ते खेळाडूंना बक्षीस देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमास क्रीडा शिक्षक श्री दीपक महानवर सर, क्रीडा शिक्षक श्री इरफान सय्यद मोहम्मद, सहशिक्षक श्री सचिन गायकवाड सर तसेच सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.सर्व मान्यवरांनी खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिंग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिंग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A.(मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २६ मार्च २०२६


## सम्राट अशोक : धर्म, न्याय आणि मानवतेचा दीपस्तंभ - डॉ. राजेंद्र बगाटे

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि शासकांनी आपापल्या कार्याची अमिट छाप सोडली आहे; परंतु ज्यांनी केवळ राज्यकारभारात यश मिळवले नाही, तर मानवी मूल्यांचा, नैतिकतेचा आणि शांततेचा मार्ग स्वीकारून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श निर्माण केला, अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये सम्राट अशोक यांचे स्थान सर्वोच्च मानले जाते. सम्राट अशोक यांची जयंती ही केवळ एका राजाची आठवण नसून, ती मानवी जीवनातील परिवर्तन, आत्मपरीक्षण आणि धर्माधिष्ठित शासनव्यवस्थेची प्रेरणा देणारी एक महान घटना आहे.सम्राट अशोक हे मौर्य साम्राज्याचे तिसरे सम्राट होते. त्यांचा जन्म इ.स.पूर्व 304 च्या सुमारास झाला असे मानले जाते. त्यांचे वडील सम्राट बिंदुसार आणि आजोबा चंद्रगुप्त मौर्य होते. चंद्रगुप्त मौर्य यांनी स्थापन केलेल्या मौर्य साम्राज्याचा विस्तार आणि सुदृढीकरण करण्याचे महान कार्य अशोकांनी केले. बालपणापासूनच अशोक हे बुद्धिमान, पराक्रमी आणि धाडसी होते. त्यांना युद्धकलेत प्रावीण्य होते आणि राज्यकारभाराची उत्तम समज होती. त्यामुळेच त्यांच्या वडिलांनी त्यांना विविध प्रांतांचे राज्यपाल म्हणून नेमले होते. तक्षशिला आणि उज्जैनसारख्या महत्त्वाच्या प्रांतांचे प्रशासन त्यांनी कुशलतेने सांभाळले.राजसिंहासनावर आरूढ झाल्यानंतर सम्राट अशोकांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अनेक मोहिमा केल्या. त्यातील सर्वात महत्त्वाची आणि ऐतिहासिकदृष्ट्या निर्णायक ठरलेली मोहिम म्हणजे कलिंग युद्ध. इ.स.पूर्व 261 मध्ये झालेल्या या युद्धात अशोकांनी विजय मिळवला; परंतु या विजयाची किंमत अत्यंत भीषण होती. हजारो सैनिक आणि निरपराध नागरिक मारले गेले, अनेक कुटुंबे उद्‌ध्वस्त झाली, आणि संपूर्ण प्रदेशात हाहाकार माजला. या युद्धानंतर अशोकांच्या मनावर खोल परिणाम झाला. रणांगणावर पडलेल्या मृतदेहांचे दृश्य, विधवा झालेल्या स्त्रियांचा आक्रोश आणि अनाथ मुलांचे दुःख पाहून अशोकांच्या अंतःकरणात प्रचंड वेदना निर्माण झाली.याच क्षणापासून अशोकांच्या जीवनात एक महान परिवर्तन घडले. त्यांनी युद्ध आणि हिंसेचा मार्ग सोडून धर्म, अहिंसा आणि करुणेचा मार्ग स्वीकारण्याचा निश्चय केला. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि 'धम्म' या संकल्पनेचा प्रसार सुरू केला. अशोकांचा 'धम्म' हा केवळ धार्मिक आचार-विचारांपुरता मर्यादित नव्हता, तर तो नैतिक जीवनपद्धतीचा मार्ग होता. सत्य, अहिंसा, करुणा, दया, सहिष्णुता, प्रामाणिकपणा आणि सर्व जीवांप्रती आदर या मूल्यांचा त्यांनी प्रचार केला.सम्राट अशोकांनी आपल्या धम्माचा प्रसार करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांनी आपल्या राज्यभर शिलालेख आणि स्तंभ उभारले, ज्यांवर धम्माचे उपदेश कोरलेले होते. हे शिलालेख आजही भारताच्या विविध भागांत आढळतात आणि अशोकांच्या विचारांचा जिवंत पुरावा म्हणून उभे आहेत. त्यांनी 'धम्म महामात्र' या अधिकाऱ्यांची नेमणूक केली, ज्यांचे काम लोकांमध्ये नैतिकता आणि सदाचार यांचा प्रसार करणे होते. अशोकांनी आपल्या प्रजेसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. त्यांनी रस्त्यांच्या कडेला झाडे लावली, विहिरी आणि धर्मशाळा बांधल्या, प्राण्यांसाठी आणि माणसांसाठी आरोग्यसेवा उपलब्ध करून दिली.सम्राट अशोकांची शासनपद्धती अत्यंत प्रगत आणि लोकाभिमुख होती. त्यांनी धर्मनिरपेक्षतेचा आदर्श ठेवला आणि सर्व धर्मांना समान आदर दिला. त्यांनी कोणत्याही एका धर्माला प्राधान्य न देता सर्वांच्या श्रद्धांचा सन्मान केला. त्यांच्या दृष्टीने राज्यकारभार हा केवळ सत्ता चालवण्याचा मार्ग नव्हता, तर तो जनतेच्या कल्याणासाठी असलेली एक जबाबदारी होती. त्यांनी न्यायव्यवस्था सुधारली आणि लोकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी विशेष यंत्रणा निर्माण केली.अशोकांनी बौद्ध धर्माचा प्रसार केवळ भारतापुरता मर्यादित ठेवला नाही, तर त्यांनी त्याचा प्रसार जगभर केला. त्यांनी आपल्या पुत्र महेंद्र आणि कन्या संघमित्रा यांना श्रीलंकेत पाठवले, जिथे त्यांनी बौद्ध धर्माचा प्रचार केला. तसेच त्यांनी इतर देशांमध्येही धम्मदूत पाठवले. यामुळे बौद्ध धर्माचा प्रसार आशिया खंडातील अनेक देशांमध्ये झाला. अशोकांच्या या प्रयत्नांमुळे भारताला 'शांततेचा संदेश देणारा देश' म्हणून ओळख मिळाली. सम्राट अशोकांच्या कार्याचा प्रभाव केवळ त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही, तर तो आजही जाणवतो. भारतीय राष्ट्रध्वजावरील अशोकचक्र हे त्यांच्या विचारांचे प्रतीक आहे. हे चक्र सत्य, न्याय आणि प्रगतीचा मार्ग दर्शवते. तसेच भारताच्या राज्यचिन्हात असलेले सिंहस्तंभ हेही अशोकांच्या काळातील वारसा आहे. यावरून अशोकांच्या विचारांचा आणि कार्याचा भारतीय राष्ट्रजीवनावर किती खोल प्रभाव आहे, हे स्पष्ट होते.आजच्या काळात, जेव्हा जगात हिंसा, द्वेष आणि असहिष्णुता वाढत आहे, तेव्हा सम्राट अशोकांचे विचार अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या जीवनातून आपल्याला हे शिकायला मिळते की, खरा विजय हा शस्त्रांच्या जोरावर मिळत नाही, तर तो मन जिंकण्याने मिळतो. अशोकांनी दाखवून दिले की, एक शासक केवळ पराक्रमी असणे पुरेसे नाही, तर तो संवेदनशील आणि नैतिकदृष्ट्या सजग असणेही आवश्यक आहे.सम्राट अशोकांची जयंती ही केवळ ऐतिहासिक स्मरणरंजनाचा दिवस नसून, ती आत्मपरीक्षणाची आणि मूल्यांचे पुनरुज्जीवन करण्याची संधी आहे. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून आपण समाजात शांतता, सौहार्द आणि न्याय प्रस्थापित करू शकतो. त्यांच्या धम्माच्या मार्गावर चालल्यास मानवजातीसाठी एक उज्ज्वल भविष्य घडवणे शक्य आहे.अशा या महान सम्राटाला त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना आपण त्यांच्या आदर्शांचे स्मरण ठेवणे आणि त्यांची अंमलबजावणी आपल्या जीवनात करणे हीच खरी त्यांना आदरांजली ठरेल. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आपण एक सुसंस्कृत, समतामूलक आणि शांततापूर्ण समाज निर्माण करण्याचा संकल्प करूया.




**- डॉ. राजेंद्र बगाटे** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra५@gmail.com


## श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात 'डेटा सायन्स अँड ॲनालिटिक्स' प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्सवात संपन्न





**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले)** : श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथे नासकॉम, आयबीएम आणि एच.एच.एच. बेंगलोर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "डेटा सायन्स अँड ॲनालिटिक्स" या कौशल्याधारित कोर्सचा प्रमाणपत्र वितरण समारंभ मंगळवार दिनांक २४ मार्च रोजी संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल करिअरच्या दृष्टीने हा कार्यक्रम विशेष प्रेरणादायी ठरला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. याप्रसंगी उपप्राचार्य विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, डॉ. वसंत हिस्सल आणि डॉ. अशोक पदमपल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी कोर्सचे समन्वयक व ट्रेनर दिल्ली येथील प्रा. भव्य टंडन यांनी विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रातील वाढत्या संधी, डेटा सायन्सचे बदलते स्वरूप आणि या कोर्समुळे विद्यार्थ्यांच्या करिअरला मिळणारी नवी दिशा याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व पटवून देत, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात डेटा सायन्सचे वाढते महत्त्व अधोरेखित केले.अध्यक्षीय समारोपात डॉ. संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना आयटी क्षेत्रातील नोकरीच्या विविध संधी, त्या मिळवण्यासाठी आवश्यक कौशल्ये तसेच विविध स्पर्धा परीक्षा व करिअरच्या पर्यायांविषयी विस्तृत माहिती दिली. त्यांनी विद्यार्थ्यांनी अशा रोजगाराभिमुख कोर्सेसचा लाभ घेऊन भविष्यात सक्षम करिअर घडवावे, असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. सूर्यकांत रेवते यांनी केले. यावेळी विद्यार्थिनी रुची चिंचोले आणि प्रतीक्षा चव्हाण यांनी मनोगत व्यक्त करत कोर्समधील आपले अनुभव आणि शिकण्याची प्रक्रिया उपस्थितांसमोर मांडली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी संगणकशास्त्र विभागातील डॉ. भरत शेळके, प्रा. रेश्मा नितनवरे, डॉ. अजय कांबळे, प्रा. फारुख मुल्ला, प्रा. गजेंद्र बनसोडे, प्रा. अब्रार कादरी, प्रा. श्रद्धा पाटील, प्रा. आरती जाधव, प्रा. सपना राठोड, प्रा. मयुरी माडजे यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निळकंठ गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राजक्ता माळी यांनी मानले.

## श्रीराम नवमी निमित्त आपेगाव येथे दुर्मिळ कृष्णवडाचे रोपण



**कन्नड (अरुण थोरात)** : आपेगाव येथील संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्मस्थळी अत्यंत दुर्मिळ व अध्यात्मिक महत्व असलेल्या कृष्णवडा चे श्रीराम नवमी निमित्त रोपण करण्यात आले आहे. कृष्ण वडाची पाने ही द्रोणा सारखी आत दुमडलेली असतात. त्या पानांचा आकार निसर्गतः कटोरी सारखा असतो. भगवान श्रीकृष्ण या द्रोणा सारख्या पानात लोणी, दही खात असत. त्यांनी या नेहमीच्या वडाच्या पानात माता यशोदे पासुन दही लपवले तेव्हा पासुन या झाडाची द्रोणा प्रमाणे झाली म्हणून हा कृष्ण वड वृक्ष साकारला. भारतात हा वृक्ष संकट श्रेणीत गणला जातो. श्रीराम नवमीचे औचित्य साधत पैठण जवळील तीर्थक्षेत्र आपेगाव येथील संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्मस्थळी व संत मुक्ताबाई उद्यानात पिठाधीपती, प्रसिद्ध कीर्तनकार संत ज्ञानेश्वर दादा आपेगावकर, सिल्लोड येथील पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील, राम महाराज तांबे, गणेश शिंदे, स्वप्नील सर्जे यांनी रोपण केले आहे. हे दुर्मिळ रोपं डॉ. पाटील यांनी विकसित केले आहे. चौकट_राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्ष व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या सातशे पन्नास व्या जयंती वर्षानिमित्त हरितवारी या उपक्रमाद्वारे संत ज्ञानेश्वर दादा यांच्या संकल्पनेतून आकारास येत असलेल्या या उद्यानात राम राज्याचे व रघुकुल प्रतीक असलेल्या कोविदार या वृक्षाचे ही रोपण करण्यात आले. कृष्ण वड झाडाची फळं अनेक पक्षी खातात. या पानात पावसाचे पाणी "साचते ते पक्षी पितात. या पानात "मॅन फेस बग" नामक महत्वाचा कीटक उन्हाळ्यात अधिवास करतांना नेहमीच आढळतो. या दैवी वृक्षास पारंब्या ही येतात. याचे शास्त्रीय नाव फायकस कृष्णाई ( ficus krushnaea ) असे आहे.-डॉ. संतोष पाटील, सिल्लोड.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरुवार २६ मार्च २०२६


## शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी जमादार डीवायएसपी तयारी करताना आलेले अनुभव लिखित पुस्तकाचे प्रकाशन



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा येथील पदव्युत्तर विभागातील करिअर कट्टा ची विद्यार्थिनी साक्षी जमादार स्पर्धा परीक्षा डीवायएसपी ची तयारी करताना आलेल्या चांगल्या आणि वाईट आठवणी आणि त्यामुळे स्वत:मध्ये आलेला आत्मविश्वास शब्दबद्ध करून लिहलेले ‘स्वत:शी चाललेली वाट’ या ललित लेख संग्रहाचे प्रकाशन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते करण्यात झाले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित या प्रकाशन सोहळयास प्रमुख उपस्थिती मध्ये उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले, पदव्युत्तर कला शाखा समन्वयक डॉ. सन्मुख मुच्छटे व सर्व विभागाचे विभाग प्रमुख तसेच करिअर कट्टा समन्वयक डॉ. एस. पी. पसरकल्ले आणि डॉ. चंद्रसेन करे यांची उपस्थिती लाभली.यावेळी आपल्या मनोगतात अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय अस्वले एखादी विद्यार्थिनी स्पर्धा परीक्षा तयारी करताना पुस्तक प्रकाशित करते याचा अभिमान शिक्षकांना आणि महाविद्यालयास आहे. याचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा आणि लेखन, वाचन आणि सर्जनशीलतेकडे वळावे, असे आवाहन केले. तर उपप्राचार्य डॉ. पद्माकर पिटले यांनी साक्षी जमादार यांच्या लेखनातील भावनिकता आणि वास्तवदर्शी शैलीचे कौतुक केले.कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थिनी साक्षी जमादार यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस.पी. पसरकल्ले यांनी केले तर आभार डॉ. सी डी करे यांनी मानले.

## हिंदी राज्य नाट्यस्पर्धेत "भभुल्या" नाटकाला अभिनय गुणवत्ता पुरस्कार





**गेवराई :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई द्वारा आयोजित ६४ वी हिंदी नाट्य स्पर्धा ३ फेब्रुवारी ते १६ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न झाली.शासनाने आयोजित केलेल्या या हिंदी नाट्य स्पर्धेत,रत्नकुमार सांभरिया लिखित आणि डॉ.असलम युनूस दिग्दर्शित "भभुल्या" हे नाटक बागबान थिएटर ग्रुप, बागबान सामाजिक प्रतिष्ठान, गेवराई, जिल्हा बीड यांनी पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, पुणे येथे २० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता, रसिक प्रेक्षकांसमोर सादर केले होते. या स्पर्धेत नागपूर, पुणे आणि मुंबई केंद्रांवर महाराष्ट्रभरातून एकूण ५८ दर्जेदार नाटके सादर करण्यात आली होती. अनेक दर्जेदार नाटके सादर झालेल्या या स्पर्धेत भभुल्या नाटकातील राजा बकरा आणि हेडकॉन्स्टेबल यांची भूमिका साकारणाऱ्या अभिनेता विपुल भोळे आणि रोहन गहिरे यांना अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्र जाहीर झाले असून लवकरच सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने त्यांना गौरविण्यात येणार असल्याचे दिग्दर्शक डॉ.असलम युनूस यांनी सांगितले. हिंदी नाटकांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्याने सुरू केलेला हा उपक्रम नाट्य कलाकारांसाठी एक पर्वणी ठरत आहे ज्यातून अनेक ताकदीचे कलावंत तयार होत आहेत असे अमरत ची भूमिका करणाऱ्या अभिनेत्री उल्का कुलकर्णी यांनी सांगितले.'भभुल्या' नाटकाचे प्रभावी सादरीकरण आणि त्यातील दोन पात्रांना अभिनय गुणवत्ता प्रमाणपत्राच्या रूपात मिळालेली मान्यता, या गोष्टी नाटकाचे महत्त्व अधोरेखित करतात असे विनोद आघाव यांनी सांगितले. उत्कृष्ट अभिनय , प्रकाशयोजना व रंगभूषा-वेशभूषा असलेले हे नाटक म्हणजे एक सुंदर अनुभव असल्याचे डॉ.गजानन दांडगे यांनी सांगितले. गेवराई येथील बागबान थिएटर ग्रुपच्या वतीने या नाटकाचे वेगवेगळ्या महोत्सवात प्रयोग होत असल्यामुळे अभिनेता म्हणून समाधान मिळत असल्याचे एस.बी.महाविद्यालयाचे प्रा .शुभम कोल्हे यांनी सांगितले. विपुल भोळे यांनी उत्कृष्ट भूमिका साकारत अभिनय कौशल्य दाखवले आहे व रोहन गहिरे यांनी एका मुक्या प्राण्याची भूमिका केली असल्यामुळे त्यांची विशेष कौतुक या निमित्ताने होत आहे. दिग्दर्शक व सर्व कलावंतांची मेहनत या निमित्ताने पुन्हा एकदा दिसून आली आहे. सातत्याने दर्जेदार नाटकं प्रेक्षकांसमोर सादर करत असल्यामुळे बागबान थिएटर ग्रुपची सकारात्मक चर्चा या निमित्ताने होत असून रंगकर्मींमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. सातत्य व टीम चे सहकार्य या बळावर ययाती,बेबी, बली, परफेक्ट संन्यास, येस आय एम गिल्टी, पारो, तीन पैशाचा तमाशा इत्यादी मराठी तसेच हिंदी नाटकांचे दिग्दर्शन डॉ. असलम युनूस यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील नाट्यशास्त्र विभाग आणि नाट्यशास्त्र विभाग, सौ .के.एस.के. महाविद्यालय बीड यांनी या नाटकाच्या निर्मिती प्रक्रियेत योगदान दिले हे विशेष. या नाटकात सहभागी कलाकार खालीलप्रमाणे अमरत - उल्का कुलकर्णी हेडकॉन्स्टेबल - विपुल भोळेराजा बकरा - रोहन गहिरेधीयानाराम - शुभम कोल्हेमनदेवा- डॉ.गजानन दांडगेएस. पी. - सूरज जैनमुन्ना - अर्णव आडे मेम - साधना विठोरेपैलवान - औदुंबर वानखडेआरोपी - विजय मस्केगावातील लोक - पांडुरंग शिंगारे, किशोर थोरात, संकेत बलांडेआणि इन्स्पेक्टरच्या भूमिकेत- डॉ.असलम युनूसतांत्रिक कलाकार प्रकाशयोजना - बाळू बटूळेसंगीत - विनोद आघाव,नेपथ्य - देवरे रामेश्वर, डॉ.गजानन दांडगे,रंगभूषा - कविता दिवेकर,वेशभूषा - पांडुरंग शिनगारे,स्टेज मॅनेजर - भूषण खोडके.मार्गदर्शक- भाग्यरवी कुलकर्णी, डॉ. संजय पाटील देवळाणकर, सहकार्य - गजमल रावबा, वाल्मीक जाधव, साहेबराव पाटील.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103



जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |